ATOMIC ENERGY EDUCATION SOCIETY, MUMBAI

Half Yearly Exam (2023 – 24)

M.M: 80 Class IX Marathi Time: 3 Hrs

Marathi- मराठी (L-2-7,9 RR व्याकरण, लेखन)

………………………………………………………………………………………………..

## विभाग-अ 15 गुण

प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

तुकडोजी महाराज (पूर्ण नाव - माणिक बंडोजी इंगळे, (१९०९-१९६८) यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे.

विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. "आते है नाथ हमारे" हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते.

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल, याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता.

कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे कसे अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.

देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला. राष्ट्रपतिभवनात झालेले तुकडोजी महाराजांचे खंजिरी वाद्यातील भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत' म्हणून संबोधिले होते.

1. उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा (कोणतेही तीन) (3x1=3)
    a. आत्मसंयमनाचे विचार तुकडोजी महाराजांनी ……. या काव्यातून मांडले.
       (ग्रामगीता /भगवतगीता /खंजिरीगीता /ग्रामीणगीता)
    b. तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत असे कोणी संबोधले म्हणून संबोधिले.
       (राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद /पंतप्रधान पंडीत नेहरू / गृहमंत्री वल्लभाई पटेल / महात्मा गांधी)
    c. कोणत्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला.
       (अमेरिका /इंग्लंड /जपान /चीन)
    d. तुकडोजी महाराज कीर्तनास कोणते वाद्य वाजवत. (ढोल / तबला /टाळ / खंजिरी)
2. खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा (कोणतेही तीन) (3x1=3)
    a. तुकडोजी महाराजांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू कोणता?
    b. तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी कोणत्या माध्यमाचा वापर केला?

c. कोणत्या आंदोलनादरम्यान काही काळ तुकडोजी महाराजांना अटक झाली होती?

d. तुकडोजी महाराजांचे पूर्ण नाव सांगा

3. उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांचे थोडक्यात उत्तर लिहा.(कोणताही एक) (2x1=2)

a. तरुणांविषयी तुकडोजींचे विचार व कार्य स्पष्ट करा.

b. स्त्रियांसंदर्भात तुकडोजी महाराजांचे विचार लिहा

प्रश्न 2) कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आजीच्या जवळी घड्याळ आहे चमत्कारिक,
देई ठेवुनि तें कुठे अजुनि हे नाही कुणा ठाउक;
त्याची टिक टिक चालते न कधिही, मुके वाटते,
किल्ली देई न त्यास ती कधि, तरी ते चालते-१

ताईची करण्यास जम्मत, तसे बाबूसवे भांडता
जाई संपुनियां सकाळ न मुळी पत्ता कधी लागता !
"आली ओटिवरी उन्हे !" म्हणे आजी, "दहा वाजले
जा जा लौकर !" कानि तो घंटाध्वनी आदळे-३

"अभ्यासास उठीव आज मजला आजी पहाटे तरी,"
जेव्हा मी तिज सांगुनी निजतसे रात्री बिछान्यावरी
साडेपाचही वाजतात न कुठे तो हाक ये नेमकी
बाळा झांजर जाहले, अरवला कोंबडा, उठ की-२

खेळाच्या अगदी भरांत गढुनी जाता अंगणी
हो तिनिसांज ते न समजे ! आजी परी आंतुनी
बोले, "खेळ पुरे, घरांत परता ! झाली दिवेलागण,
ओळीने बसुनी म्हणा परवचा ओटीवरी येउन-४

आजीला बिलगून ऐकत बसू जेव्हा भुतांच्या कथा
जाई झोप उडून, रात्र किती हो ध्यानी न ये ऐकता !
"अर्धी रात्र " म्हणे उलटली, "गोष्टी पुरे ! जा पडा
लागे तो धिडधांग पर्वतिवरी वाजावया चौघडा-५

सांगे वेळ, तशाच वार-तिथीही आजी घड्याळातुनी
थंडी पाऊस ऊनही कळतसे सारें तिला त्यांतुनी
मौजेचे असले घड्याळ दडुनी कोठे तिने ठेविले?
गाठोडे फडताळ शोधुनि आलो ! तरी ना मिळे-६

1. कविता वाचून त्यावर प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा (कोणतेही तीन)(3x1=3)
   a. आजीकडे कोणत्या प्रकारचे घड्याळ आहे?
      (इलेक्ट्रॉनिक / भिंतीवरचे/ चावीवाले / निसर्गाचे)
   b. आजी रात्री कोणत्या गोष्टी सांगते? (विज्ञानाच्या / रहस्य / भूतांच्या / सणांच्या
   c. ओटिवरी उन्हे आल्यावर किती वाजलेले असतात?
      (सकाळचे दहा / संध्याकाळचे सहा / रात्रीचे नऊ / दुपारचे बारा)
   d. सर्व ऋतू, वार, तिथी सांगणाऱ्या घड्याळाचा शोध कवी कुठे घेण्याचा प्रयत्न करतो?
      (झाडावर / अंगणात/ शाळेत / गाठोडे व फडताळात)
2. कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात (कोणतेही चार) (4x1=4)
   a. आजीच्या घड्याळाचा आवाज कसा आहे?
   b. सकाळचे साडेपाच वाजले हे आजीला कसे कळते?
   c. "खेळ पुरे, घरांत परता' असे आजी कोणत्या वेळी म्हणते?
   d. या कवितेतून या कुटूंबात कमीतकमी किती मुले असतील असे कळते?
   e. ही कविता कोण म्हणत असेल असे तुम्हास वाटते?

## <u>विभाग-ब व्याकरण-20 गुण</u>

प्रश्न 3) व्याकरण प्रश्न सूचनेप्रमाणे लिहा

1. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही चार) (4x1=4)
   a. खालीलपैकी विशेषनामाचा योग्य पर्याय कोणता? (शहाणपणा /गंगा /नदी/ पर्वत)
   b. खालीलपैकी योग्य विधाने कोणती? (वस्तुच्या नावाला सर्वनाम म्हणतात. /क्रियापदाचे विशेष गुण दाखवते ते विशेषण / दोन शब्द किंवा वाक्य यांना जोडते ते उभयान्वयी अव्यय / क्रिया दाखविणारा शब्द म्हणजे शब्दयोगी अव्यय)
   c. पुढीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते? (अबब! केवढा मोठा हा साप! / छे!उगाच काहीतरी बोलू नकोस! /थांब, रस्ता नीट ओलांड. /वा! किती छान अक्षर आहे तुझे!)
   d. पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा पर्याय वापरा.

      घरी मोदक केले होते,....... गणेश चतुर्थी होती.
   e. वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा-

      माणसाने <u>सतत</u> संशोधक वृत्तीने काम करावे।
2. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3x1=3)
   a. वाक्याचा काळ ओळखा.---- मी उद्या फिरायला जाणार आहे.
   b. भूतकाळातील वाक्य तयार करा. चांद्रयान चंद्रावर उतरेल
   c. वाक्याचा काळ ओळखा...... लहानपणी मी कॉम्प्युटर गेम खेळत असे
   d. वर्तमानकाळातील वाक्य बनवा... झाडावर पक्षाचे घरटे होते.
3. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3x1=3)
   a. विधानार्थी वाक्य बनवा. बदमाश लोकांपासून सावध राहायला नको का?
   b. अर्थ न बदलता विधानार्थी नकारात्मक वाक्य बनवा...... किती महाग आहेत टोमॅटो!

c. वाक्याचा प्रकार ओळखा.  हे ईश्वरा, सर्वांना चांगली बुद्धी दे!

d. प्रश्नार्थक वाक्य बनवा.  पुस्तकांवर प्रेम करावे.

4. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही दोन) (2x1=2)

a. निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता ते ओळखा. (ढग /पेन /डबा /खुर्च्या)

b. वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा. विमान ढगाच्या वर उडत होते.

c. घोडा- या शब्दाच्या अनेक वचनाचा वापर करून वाक्य बनवा.

प्रश्न 4) व्याकरण प्रश्न सूचनेप्रमाणे लिहा

1. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही दोन). (2x1=2)

a. भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा. (कुत्रा /बैल /मोर /वाघीन)

b. लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा. (पंखा /सुरी /मुलगा /चमचा)

c. पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द कोणता? (दरवाजा /वही /शाळा /बाई)

2. सूचनेप्रमाणे लिहा (कोणतेही दोन). (2x1=2)

a. समानार्थी शब्दांची जोडी कोणती? (धन-संपत्ती / पाप-पुण्य / नदी-समुद्र /मेघ- आकाश)

b. गटात न बसणारा शब्द कोणता? (रवी /सूर्य /शशी /मित्र)

c. गटात न बसणारा शब्द कोणता? (अभिनंदन /वंदन /नमस्कार/ प्रणाम)

3. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही दोन). (2x1=2)

a. विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

(आंधळा- डोळस /अवघड-कठीण /अडचण- समस्या /अन्न- आहार)

b. गटात न बसणारा शब्द कोणता? (गच्च /गर्द /दाट /विरळ)

c. प्रेमळ - या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.

4. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही दोन). (2x1=2)

   a. खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

      (पंचवटी /चातुर्मास /गैरहजर /त्रिकोण)

   b. या समासाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाबरोबरच त्या जातीच्या इतर पदार्थांचा समावेश केलेला असतो अशा समासाला....... समास म्हणतात.

      (इतरेतर द्वंद्व /वैकल्पिक द्वंद्व /समाहार द्वंद्व /द्विगू)

   c. खरेखोटे या शब्दांचा समास ओळखा-

      (इतरेतर द्वंद्व /वैकल्पिक द्वंद्व /समाहार द्वंद्व /द्विगू)

## <u>विभाग- क- पाठ्यपुस्तक आधारित गुण 30</u>

प्रश्न 5) धड्यांचे प्रश्न सूचनेप्रमाणे लिहा

1. एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3x1=3)

   a. बेटा, मी ऐकतो आहे! या पाठातून शिरीषचा कोणता स्वभाव दिसतो?

   b. 18 एप्रिल 1853 रोजी सुरू झालेल्या वाफेवर चाललेल्या मुंबई ठाणे पहिल्या रेल्वेला किती डबे होते?

   c. बांबूच्या निरनिराळ्या जाती गोळा करण्यात एडिसनच्या सहकाऱ्यांना कोणत्या अडचणी आल्या?

   d. 21 ऑक्टोबर 1929 या दिवशी लावलेल्या दिव्याच्या शोधाला पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून अमेरिकेच्या पोस्ट खात्याने कोणते तिकीट प्रसिद्ध केले?

   e. फनी बँकर्स या स्त्री खेळाडूने 1948 साली ऑलिम्पिकच्या कोणत्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळविला?

2. रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा (कोणतेही तीन)(3x1=3)

   a. नाना रोज शिरीषबरोबर येत; कारण........ (ते चांगले गायक होते /त्यांना संगीतसेवा बहिरेपणामुळे करता येत नव्हती /कोणीतरी संगीतासाठी धडपड करीत असल्याचे पाहण्यात त्यांना सुख मिळते /त्यांना शिरीषचे वादन ऐकायचे होते)

   b. जी आय पी- रेल्वे म्हणजे...... (ग्रेट इंडियन पेनिनशुला /गुड इंडियन पेनिनशुला /ग्रेट इंडो ब्रिटीश पेनिनशुला /ग्रँट इंडो ब्रिटीश पेनिनशुला)

   c. कुबरटीन नावाच्या फ्रेंच क्रीडा तज्ञाने १८९४ साली ..........भरवली होती. (ऑलिंपिक काँग्रेस /कॉंग्रेस ऑलिंपिक /ऑलिंपिक व्हीलेज /ऑलिंपिक समिती)

   d. 1956 रोजी पहिले ऑलम्पिक व्हिलेज........ येथे वसले.

      (ग्रीस /मेलबर्न /फ्रान्स /अमेरिका)

   e. सतत दहा ते बारा वर्षे प्रयोग केल्यानंतर दिव्यामध्ये फिलामेंटसाठी........ धातूचा प्रयोग यशस्वी झाला. (लोखंड /प्लॅटिनम /बांबू /टंगस्टन)

3. कोणत्याही एका प्रश्नाचे 40 ते 50 शब्दात उत्तर लिहा (कोणतेही एक) (1x3=3)

   a. सर हंफ्रे डेव्ही यांनी तयार केलेल्या दिव्याच्या मर्यादा सांगा

   b. ऑलिम्पिकचे ब्रीदवाक्य सांगून त्यातून मिळणारा संदेश लिहा

   c. रेल्वेसाठी बोरघाटाचे काम चालू असताना पुणे ते खोपोली हा प्रवास करायचे?

4. वाक्प्रचारांचा वाक्यात योग्य ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (5x1=5)

   (स्फूर्ती वाढणे / धडपड करणे / पाठबळ मिळणे / प्रशंसा करणे / विचारचक्र सुरू होणे)

   a. रांगोळी स्पर्धेत माझा पहिला क्रमांक आल्यामुळे सर्वांनी माझे कौतुक केले.

   b. कबड्डी स्पर्धेत जिंकायचे कसे यावरील युक्त्यांबाबत मी चिंतन सुरू केले.

   c. यशासाठी सतत प्रयत्न करणारा मनुष्य आपले ध्येय साध्य करतो

d. मला नवीन लॅपटॉप आणून दिल्यामुळे माझा  अभ्यासाचा उत्साह वाढला

e.  शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आयआयटीसाठी माझी चांगली तयारी चालू आहे

प्रश्न 6) कवितांचे प्रश्न सूचनेप्रमाणे लिहा

1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. (कोणतेही चार) (4x1=4)
   a. संत बहिणाबाई यांच्या 'संत कृपा झाली'  या अभंगातून कोणती माहिती मिळते?
   b. वारकरी संप्रदायाच्या इमारतीचा कळस कोणी चढवला?
   c. व्यायामामुळे कोणती प्रवृत्ती वाढते, असे तुकडोजी महाराज म्हणतात?
   d. आरोग्यम् धनसंपदा म्हणजे काय?
   e. सृष्टीच्या निसर्गसौंदर्यात मनमोहक बदल कोणत्या ऋतूत होतो?
   f. कोकिळेची सुरेल तान कुठून येते?
2. रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा (कोणतेही चार)(4x1=4)
   a. जनार्दन स्वामींचे शिष्य संत एकनाथ यांनी वारकरी संप्रदायाच्या इमारतीसाठी कोणते काम केले? (पाया बांधला /कळस चढवला /  भिंती रचल्या / ईश्वरी ज्ञानाचे  खांब दिले)
   b. तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।। या ओळींचा अर्थ काय आहे?  (तुकाराम महाराज कळस झाले /तुकाराम महाराजांनी सांगितलेले तत्त्वज्ञान हळूहळू आत्मसात करा /हळूहळू टाळ- मृदुंग वाजवा  /सावकाश भजन केल्याने देव पावतो)
   c. व्यायामामुळे पुढील फायदा होत नाही (जडत्व जाऊन अंगात तरतरी येते /शरीरातील रक्त व्यवस्था उत्तम राहून विचारांचा सजीवपणा वाढतो /अग्निदीपन होऊन सहज अन्न पचन होते /स्नायू अशक्त होतात)
   d. शरीराची रोगाला विरोध करणारी शक्ती ती म्हणजे.....

      (रोगप्रतिकारक /रोगनिवारक शक्ती /आरोग्यदायी शक्ती /रोगकारक शक्ती)

e. कवयित्रीच्या मध्ये दाही दिशांना रंग उधळले, कारण ....... (पाऊस आला /वसंत ऋतुचे आगमन झाले /आकाशात इंद्रधनुष्य आले /आंब्याला मोहर आला)

f. जगातील सर्व फुले मनात झुरू लागली, कारण...... (मातीत पळस फुले बहरून आली /पिंपळपाने मोरपिसासारखी सळसळली /घाणेरी नटली /लुसलुशीत पानांचा वड झुलला

3. खालीलपैकी काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा (कोणतीही एक) (1x3=3)

   a. ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिले देवालया।।

   b. व्यायामाने सशक्त स्नायू। व्यायामे मानवा होय दीर्घायु।

   c. पळसफुले ही भहरून आली,या मातीच्या अंकावरती।

      कुसुमे सारी या जगातली, पाहून त्यांना मनात झुरती

प्रश्न 7) स्थूलवाचनाचे प्रश्न सूचनेप्रमाणे लिहा

1. खालीलपैकी प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा (कोणतेही तीन) (3x1=3)

   a. पॉटर टॅक्सी म्हणजे काय?

   b. न्यूयॉर्क, मुंबई, हॉगकॉग अशा शहरापेक्षा व्हेनिस हे शहर वेगळे का आहे?

   c. ग्रॅंड कॅनॉल कोणत्या देशात आहे?

   d. व्हेनिसमधील मुख्य व्यवसाय कोणता?

   e. व्हेनिसमध्ये बाहेरून यायला कोणती व्यवस्था आहे?

2. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे 40 ते 50 शब्दात उत्तर लिहा (1x2=2)

   a. ट्रेनमधून उतरल्यावर व्हेनिसमध्ये कोणता अनुभव येतो?

   b. शहरात पूर आला आहे असे लंडनहून आलेला मुनीम का म्हणाला?

## <u>विभाग- ड- लेखन गुण 15</u>

प्रश्न 8) लेखनविभागाचे प्रश्न सूचनेप्रमाणे लिहा

1. कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 ते 250 शब्दात निबंध लिहा (1x6=6)
    a. मी शेतकरी बोलतोय..... मुद्दे: जन्म- परिचय- शेती हा पारंपारिक व्यवसाय- शेतात राबणे- देशासाठी योगदान- जनतेचे भरण, पोषण- आज शेती न परवडणारी बाब- बी-बियाणे, खते, औषधी महाग--शेती उत्पादनास भाव नाही- कर्जाचा डोंगर- जगणं असह्य- आत्महत्येस प्रवृत्त - सरकारचे दुर्लक्ष - सरकारकडून अपेक्षा
    b. निसर्ग आपला गुरु:---मुद्दे: निसर्ग व मानव यांचा संबंध - निसर्गातील प्रतिके - नदी, समुद्र, आकाश सूर्य झाडे, पशू पक्षी, माणसाला प्रसन्न करतात - निसर्ग आपल्याला जगवतो - निसर्ग समतोल साधतो - संरक्षणाची जबाबदारी - मानवाचे कर्तव्य
    c. मी मुख्यमंत्री झालो तर– निवडणूकीत आश्वासनांची खैरात-- प्रत्यक्ष कार्य व्हावे-- कार्य हाच प्रचार ठरावा- जनतेचा सेवक- राज्य जनतेचे आहे-- जनतेत विश्वास निर्माण झाला पाहिजे-- भ्रष्टाचाराला आळा बसणे आवश्यक-- मुख्यमंत्री सामान्य जनते पर्यंत पोहोचला पाहिजे-- लवाजमा इतर अनावश्यक खर्च वाचवला पाहिजे- आळस झटकून कामाला महत्त्व-- समारोप
2. मुद्द्यांच्या आधारे कथा लिहून शीर्षक व तात्पर्य द्या (कोणतेही एक) (1x5=5)
    a. एक राजा- राज्यातील लोक आळशी- त्यांना उद्योगी बनवायचा राजाचा विचार - रस्त्यातएक भला मोठा दगड ठेवतो- त्याच्याखाली लहानशी पिशवी- अनेक लोक बाजूने जातात- पण दगड तसाच- एक गरीब मनुष्य तो बाजूला करतो- त्याला पिशवी

दिसते- त्याला पिशावितील सोन्याची नाणी मिळतात- बाजूला बक्षिस अशी चिट्ठी - लोक उद्योगी बनतात. तात्पर्य.

b. एक मुंगी- तळ्यात पडते- बाहेर निघता येत नाही- काठावर झाड- झाडावरील कबुतराला मुंगीची दया येणे- झाडाचे पान पाण्यात टाकणे- मुंगीचे त्या आधारे काठावर येणे- काही दिवसांनी एका शिकाऱ्याने कबुतरावर नेम धरणे- मुंगीने शिकाऱ्याचा चावा घेणे- उपकाराची परतफेड (तात्पर्य)

3. खालील विषयावर पत्र लिहा (लिफाफा आवश्यक) (कोणतेही एक) (1x4=4)

a. राजेश / स्मिता परब, विश्वकर्मा कॉलनी, माहिम रोड, मुंबई येथून, नगराध्यक्ष मुंबई महानगरपालिका, यांना शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याचे तक्रारपत्र लिहितो/लिहिते.

b. सतिश / संध्या चव्हाण, शाळा ग्रंथालय प्रतिनिधी, गांधी विद्यालय रायपूरनगर, पुणे, येथून पॉप्युलर बुकडेपो, शिवाजीनगर, औरंगाबादर यांना, ग्रंथालयाकरीता पुस्तके मागवणारे पत्र लिहितो/लिहिते.

xxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxx